अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मुदतवाढ देणेबाबत -
जिल्हा व सत्र न्यायालय बीड,
दिनांक ०१.०३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधीसाठी¤........................

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदनि २०१८/प्र.क्र.५४/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १६ मार्च, २०१८

वाचा-

१ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः एचसीटी १००२/१२८९/(१६२)/नऊ / चार, दिनांक ०८.०९.२००३
२ शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ५ मार्च, २०१८
३ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः पदनि १५१७/प्र.क्र.१०२/का.१२, दिनांक १६ जानेवारी, २०१८
४ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय बीड यांचे पत्र क्रमांक O.No.Adm./B-२/१४११/२०१८, दिनांक ०९.०३.२०१८

शासन निर्णय-

संदर्भाधीन दिनांक १६.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा व सत्र न्यायालय बीड यांच्या आस्थापनेवरील ११४ अस्थायी पदांना दिनांक २८.०२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. संबंधित न्यायालयांचे कामकाज सुरळीत सुरु राहण्यासाठी खाली दर्शविलेल्या तक्त्यात नमूद केल्यानुसार ११४ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	दिनांक २८.०२.२०१८ पर्यंत मुदतवाढ दिलेली पदे	दिनांक ०१.०३.२०१७ ते २८.०२.२०१८ या कालावधीत समावेशन समायोजन केलेली पदे	पदनिर्मितीचा / समावेशनाचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	दिनांक ०१.०३.२०१८ पासून ३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ द्यावयाची पदे
१	२	३	४	५	६
१	अधिक्षक	१		शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांक संकीर्ण २०१४/प्र.क्र.२७/कार्यासन ६, दिनांक १८ जानेवारी, २०१७ व जिल्हा न्यायालय बीड यांचे आदेश क्र.प्रशा/२८८२/२०१७, दिनांक २२.०३.२०१७	१
२	सहायक अधिक्षक	७			७
३	लघुलेखक उ.श्रे.	१			१
४	लघुलेखक नि.श्रे.	१६	+१		१७
५	वरिष्ठ लिपिक	९			९
६	कनिष्ठ लिपिक	३२			३२
७	लघुटंकलेखक	१	-१		०
८	मुख्य बेलिफ	२			२
९	बेलिफ	१३			१३
१०	वाहन चालक	१			१
११	उदकी	२			२
१२	सफाईगार	८			८
१३	पहारेकरी	८			८
१४	झेरॉक्स मशीन चालक	१			१
१५	पुस्तक बांधणीकार	१			१
१६	शिपाई	११			११
	एकूण	११४			११४

२. विधि व न्याय विभाग कार्यासन ९ यांचेकडून मुदतवाढ मिळणारी पदे या शासन निर्णयातून वगळली आहेत.

३. यासाठी येणारा खर्च "२०१४-न्यायदान" या मुख्य लेखाशीर्षाखाली १०५ (दोन) जिल्हा व सत्र न्यायाधिश", “१०५-(तीन) दिवाणी न्यायाधिश" व "१०८ फौजदारी न्यायालये" यांपैकी योग्य त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या लेखाशीर्षाखालील संबंधित वित्तिय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ नुसार वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग तीन मधील अ.क्र. ४ चा परिच्छेद क्र. २७(२) (क) अन्वये तसेच, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारांन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१७१५३८२०१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhagyashree Rajendra Bhaidkar

Digitally signed by Bhagyashree Rajendra Bhaidkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d567849462918ceb7579bb2b56247e927c039bbdf028022a8b9ce837a7c854bb, serialNumber=fb84fefefe4ee219c1bc35b35201c14eab0903e8194a7413a74eed93f32afdb0, cn=Bhagyashree Rajendra Bhaidkar
Date: 2018.03.16 17:17:03 +05'30'

(भाग्यश्री भाईडकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महाप्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई,
२. प्रबंधक (निरीक्षणे-१), मा.उच्च न्यायालय मुंबई,
३. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर, औरंगाबाद
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र मुंबई,
५. महालेखापाल (लेखापरीक्षा) एक, महाराष्ट्र मुंबई,
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) दोन, महाराष्ट्र नागपूर,
७. महालेखापाल (लेखापरीक्षा) दोन, महाराष्ट्र नागपूर,
८. सह सचिव, विधि व न्याय विभाग, नागपूर, औरंगाबाद,
९. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, बीड,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, बीड,
११.उप कोषागार अधिकारी, बीड,
१२. वित्त विभाग, आ.पु.क., व्यय-५, अर्थसंकल्प ११, मंत्रालय, मुंबई
१३.विधि व न्याय विभाग, कार्यासन २३ व २४,
१४.निवडनस्ती (का.१२).